Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/12 वी परीक्षा/3927
दिनांक : 24 DEC 2024

प्रति,
मुख्याध्यापक व प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

**विषय:-** **फेब्रु-मार्च 2025 च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) परीक्षेकरिता उपस्थिती मधील तूट (Deficiency in Attendance) क्षमापित करणे तसेच आवेदनपत्र रद्द करणेबाबत...**

**संदर्भ:-** **क्र.रा.मं./परीक्षा-8/4864 दि.18/12/2024 यांचे पत्र**

आपल्या माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयामार्फत फेब्रु-मार्च 2025 च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10वी) परीक्षेकरिता प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची हजेरीतील तफावत क्षमापित करणे तसेच आवेदनपत्र रद्द करणेबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

1. **विद्यार्थ्यांच्या हजेरीतील तफावत क्षमापित करणे** -

उपस्थितीची गणना प्रथम सत्र शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय सुरु झाल्यापासून दि.15/10/2024 पर्यंत व दुसरे सत्र दि.31/01/2025 पर्यंत करण्यात येते. या कालावधीत नियमित विद्यार्थ्यांची प्रथम व व्दितीय सत्रातील हजेरी प्रत्येक सत्रात स्वतंत्रपणे 75% भरणे आवश्यक आहे. ज्या नियमित विद्यार्थ्यांची उपस्थिती प्रथम व व्दितीय सत्रात स्वतंत्रपणे अथवा अपवादात्मक प्रकरणी दोन्ही सत्रात स्वतंत्रपणे 50% पेक्षा जास्त परंतु 75% पेक्षा कमी आहे. अशा विद्यार्थ्यांची हजेरीतील तफावत क्षमापित करण्याकरिता प्रस्ताव मंडळ कार्यालयास त्वरीत सादर करावा.

तथापि त्यासाठी 1) विद्यार्थ्यांचा प्रलंबित आजार 2) विद्यार्थ्यांच्या आई/ वडीलांचे आकस्मित निधन 3) अनपेक्षित कारणांमुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/ परदेशी जाणे भाग पडणे 4) नैसर्गिक आपत्ती 5) याखेरीज अन्य रास्त कारण असल्यास अशा कारणांच्या सबळ पुराव्यासह (दाखला/प्रमाणपत्र) सत्रवार तफावतीची नोंद करुन मुख्याध्यापक/ प्राचार्यांच्या स्पष्ट शिफारशीसह सोबत दिलेल्या परिशिष्टानुसार स्वतंत्र प्रस्ताव पाठवावेत. प्रत्येक विद्यार्थ्यांचे स्वतंत्र परिशिष्ट द्यावे. अशा प्रस्तावांबर मा.अध्यक्ष यांनी दिलेला निर्णय अंतिम व बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी.

2. **आवेदनपत्र रद्द करणे** -

ज्या विद्यार्थ्यांची हजेरी दोन्ही सत्रात स्वतंत्रपणे अगर एका सत्रात 50% पेक्षा कमी आहे अशा विद्यार्थ्यांची हजेरी क्षमापित करण्यासाठी शिफारस करावयाची नाही. अशा विद्यार्थ्यांचे आवेदनपत्रात रद्द करण्यासाठी स्पष्ट शिफारस करावी व असे प्रस्ताव प्रवेशपत्र मिळाल्यानंतर सोबत दिलेल्या परिशिष्ट VII-अ नुसार एकत्रितरित्या मंडळाकडे सादर करावेत.

उपरोक्त बाबतचे फेरप्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. यासंदर्भात आवश्यकता भासल्यास मंडळाकडून हजेरीसंदर्भातील मुळ अभिलेखाची मागणी करण्यात येईल त्यावेळी ते सादर करणे आवश्यक राहील. तसेच विद्यार्थ्यांचे नैसर्गिक आपत्तीचे कारण वगळता इतर कारणासाठी प्रति विद्यार्थी प्रशासकीय खर्च रु.500/- प्रमाणे शुल्क आकारुन आवेदनपत्र रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तरी, विद्यार्थ्यांची हजेरीतील तफावत क्षमापित करणे तसेच आवेदनपत्र रद्द करणेबाबत सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात मंडळ कार्यालयास परीपूर्ण प्रस्ताव दिनांक 31 जानेवारी 2025 पर्यंत सादर करावेत.

**(सुभाष रा.चौगुले)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

सोबत :- 1) परिशिष्ट VII-क विद्यार्थ्यांची 50% ते 59% दरम्यानची हजेरी क्षमापित करण्याबाबतचा नमुना फॉर्म
2) परिशिष्ट VII-ब हजेरीतील 60% ते 75% तफावत क्षमापित करण्यासाठी सादर करावयाचा नमुना फॉर्म
3) परिशिष्ट VII-अ आवेदनपत्र रद्द करणेकरिता नमुना फॉर्म

# परिशिष्ट VII-क

## विद्यार्थ्यांची ५०% ते ५९% दरम्यानची हजेरी क्षमापित करण्याबाबतचा नमुना फॉर्म

शाळा/महाविद्यालयांचे कार्यालयाचे वापरासाठी

परीक्षेचे नाव : ________
विभागीय मंडळ, कोल्हापूर
प्रकरणिका क्रमांक ________

१) परीक्षेचे नाव : माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी / मार्च २००

२) विद्यार्थ्याचे नाव : ________

३) शाळेचे व क. महाविद्यालयाचे नाव : ________

सांकेतिक क्रमांक : ☐☐ ☐☐ ☐☐☐

पत्ता : ________

४) दोन्ही सत्रातील विद्यार्थ्याची सरासरी हजेरी :

| प्रथम सत्रातील हजेरी<br>शाळा / क. महाविद्यालय उघडण्याचा दिनांक ते दिनांक १५-१०-२०० पर्यंत | | | | द्वितीय सत्रातील हजेरी<br>दि. १६-१०-२०० ते ३१-०१-२०० पर्यंत | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रत्यक्ष कामाचे दिवस | ७५ टक्के दिवस | प्रत्यक्ष हजेरी | प्रत्यक्ष हजेरीची टक्केवारी | प्रत्यक्ष कामाचे दिवस | ७५ टक्के दिवस | प्रत्यक्ष हजेरी | प्रत्यक्ष हजेरीची टक्केवारी |
| | | | | | | | |

५) विद्यार्थ्यांची हजेरी ५०% ते ५९% दरम्यान भरण्याचे कारण (खालील योग्य कारणावर (✓) अशी खूण करावी.)

अ) विद्यार्थ्यांचा प्रदीर्घ आजार

ब) विद्यार्थ्यांची आई/वडिलांचे आकस्मित निधन

क) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास दरम्यान नव्याने कामाधंद्यासाठी परगावी/परदेशी जाणे भाग पडल्यास.

ड) नैसर्गिक आपत्ती.

इ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास.

६) उपरोक्त कारणाचे अनुषंगाने सादर केलेला पुरावा (पुराव्याच्या मुळ प्रती सादर कराव्यात)

१) ____________________

२) ____________________

७) क. महाविद्यालय प्रमुखाची शिफारस ____________________

____________________

मुख्याध्यापक / प्राचार्यांची स्वाक्षरी

८) विभागीय अध्यक्षांची शिफारस :

मी या प्रकरणी सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी केली असून उमेदवाराने कमी (५०% ते ५१%) हजेरीसाठी दिलेले कारण योग्य असून केवळ अपवादात्मक प्रकरण म्हणून या उमेदवाराच्या उपस्थितीतील त्रुटी मंडळ विनियम क्र. ४१/८८ मध्ये केलेल्या दुरुस्त तरतुदीनुसार क्षमापित करण्याचे मान्य शिफारस करण्यात येत आहे.

विभागीय अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर

●●●

शाळा/कनिष्ठ महाविद्यालय

सांकेतिक क्रमांक : ☐☐ ☐☐ ☐☐☐

# परिशिष्ट VII-ब

## माध्यमिक / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा मार्च २००

## हजेरीतील ६०% ते ७५% तफावत क्षमापित करण्यासाठी सादर करावयाच्या प्रकरणांचा तक्ता

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे संपूर्ण नांव | क. महाविद्यालय सुरू झाल्याच्या दिनांकापासून १५-१०-२०० पर्यंत पहिल्या सत्रातील एकूण क. महाविद्यालयाचे कामाचे दिवस | विद्यार्थ्यांचे पहिल्या सत्रातील हजेरीचे एकूण दिवस | हजेरीचे टक्केवारी पहिले सत्र | १६-१०-२०० ते ३१-०१-२०० पर्यंतच्या दुसऱ्या सत्रातील एकूण कामाचे दिवस | विद्यार्थ्यांचे दुसऱ्या सत्रातील हजेरीचे एकूण दिवस | हजेरीची टक्केवारी दुसरे सत्र | प्राचार्यांनी हजेरीतील तफावत क्षमापित करणे बाबतची सकारण स्पष्ट शिफारस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | |
| २ | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | |

शाळा/क. महाविद्यालयाचा शिक्का

दिनांक :

पहिले सत्र : शालेय कामाचा कालावधी शाळा सुरू झाल्यापासून दि. १५/१०/२००...... पर्यंत एकूण दिवस ............

दुसरे सत्र : शालेय कामाचा कालावधी दिनांक १६/१०/२००.... पासुन दि. ३१/०१/२००..... पर्यंत एकूण दिवस ............

प्राचार्यांची सही/शिक्का



MSBSHSEB

शाळा/कनिष्ठ महाविद्यालय
सांकेतिक क्रमांक : ☐☐ ☐☐ ☐☐☐

# परिशिष्ट VII-अ

## माध्यमिक / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा मार्च २००

## आवेदनपत्र रद्दकरिता

प्रथम व द्वितीय सत्रामध्ये स्वतंत्रपणे ७५ टक्के पेक्षा कमी हजेरी असलेल्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे रद्द करणेबाबत सादर करावयाच्या पपत्राचा नमुना

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे संपूर्ण नांव | शाळा सुरू झाल्यापासून पहिल्या सत्रातील एकुण शालेय कामाचे दिवस १५-१०-२०० पर्यंत | विद्यार्थ्यांचे पहिल्या सत्रातील हजरीचे दिवस | हजेरीचे टक्केवारी पहिले सत्र | दुसऱ्या सत्रातील एकुण शालेय कामाचे दिवस १६-१०-२०० ते ३१-०१-२०० पर्यंत | विद्यार्थ्यांचे दुसऱ्या सत्रातील हजेरीचे दिवस | हजेरीची टक्केवारी दुसरे सत्र | क. महाविद्यालय प्रमुखांची आवेदन पत्र रद्द करणेबाबतची स्पष्ट शिफारस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | |
| २ | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | |

कॉलेजचा शिक्का :-

पहिले सत्र : शालेय कामाचा कालावधी शाळा सुरू झाल्यापासून दि. १५/१०/२००...... पर्यंत एकूण दिवस .............

दुसरे सत्र : शालेय कामाचा कालावधी दिनांक १६/१०/२००.... पासुन दि. ३१/०१/२००..... पर्यंत एकूण दिवस .............

प्राचार्यांची सही/शिक्का